

■ २२ कॅरेट सोने दर : १,४२,३००/- ■ चांदी दर : २,३५,०००/-



शब्दांना सत्याची धार

# प्रहार

सिंधुदुर्ग ● शनिवार १९ सप्टेंबर, २०२६

RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ ● वर्ष २२ ● अंक ३१० ● पाने ८ ● ₹ ५.००

https://prahaardigital.com/ epaper.prahaar.in




पुरुष सॉफ्ट टेनिस स्पर्धेत भारतीय संघाचे आव्हान संपुष्टात

पान ८

# तृणमूल काँग्रेस पक्षाचे नाव, चिन्ह गोठवले

## ममता बॅनर्जींचे नवे चिन्ह 'फुटबॉलपटू'; निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

**कोलकाता**

निवडणूक आयोगाने तृणमूल काँग्रेस पक्षाचे नाव आणि या पक्षाचे चिन्ह दोन्ही गोठवले. ममता बॅनर्जी आणि ऋतब्रत बॅनर्जी या दोन्ही गटांनी येत्या विधानसभेच्या पोटनिवडणुकीत तृणमूल काँग्रेस हे नाव आणि पक्षचिन्ह वापरू नये, असेही निवडणूक आयोगाने म्हटले आहे. यानंतर आता निवडणूक आयोगाने 'ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि 'फुटबॉलपटू' हे चिन्ह देण्यात आले आहे. तर, अरुप रॉय यांच्या गटाला 'डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस' असे नाव देऊन 'लिफाफा' चिन्ह दिले आहे.

ममता बॅनर्जी आणि ऋतब्रत बॅनर्जी या दोन्ही गटांना विधानसभेच्या पोटनिवडणुकीत तृणमूल काँग्रेस हे नाव आणि पक्षचिन्ह दोन्ही वापरता येणार नसल्याचे स्पष्ट केल्यानंतर नवे नाव आणि चिन्ह निवडण्यासाठी शुक्रवारपर्यंतची मुदत दिली होती. दोन्ही गटांनी आयोगाकडे पक्षाची नावे आणि चिन्ह याचे पर्याय सादर केले होते. त्यानुसार आज आयोगाने एका आदेशाद्वारे ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसला



पश्चिम बंगाल, मेघालय आणि त्रिपुरा या राज्यांमध्ये 'ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि 'फुटबॉलपटू' हे चिन्ह दिले आहे.

**अरुप रॉय गटाला 'लिफाफा' चिन्ह**

आयोगाच्या आदेशानुसार, याचिकाकर्ते अरुप रॉय आणि ममता बॅनर्जी यांना ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस हे नाव आणि पक्षाचे चिन्ह फूल आणि गवत हे वापरता येणार नाही. याबाबतचा आदेश १७ सप्टेंबर रोजी काढण्यात आला आहे.

दरम्यान, निवडणूक आयोगाने दोन्ही गटांना पक्षाच्या नावासाठी तीन आणि चिन्हासाठी तीन पर्याय सुचवण्यास सांगितले होते. यानुसार आयोगाने अरुप रॉय यांच्या नेतृत्वाखालील गटाला डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस असे नाव आणि लिफाफा हे देण्यात आल्याचे आदेशात म्हटले आहे.

**पोटनिवडणुकीसाठी करता येणार वापर**

तसेच, ममता बॅनर्जी यांच्या गटाला 'ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि 'फुटबॉलपटू' हे चिन्ह दिल्याचे आदेशात म्हटले आहे. (पान २ वर)

# परदेशातील शिक्षणाची संधी आता महाराष्ट्रातच

## राज्यात सात आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे आगमन : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई**

उच्च शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना आता महाराष्ट्रातच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्याची नामी संधी उपलब्ध होणार आहे. राज्यात आतापर्यंत सात आंतरराष्ट्रीय विद्यापीठे आली असून, 'युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया'च्या मुंबई कॅम्पसचे नुकतेच उद्घाटन झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली. परदेशात न जाता भारतातच उत्कृष्ट शिक्षण मिळण्याच्या या नव्या सुविधेमुळे राज्यातील विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या आणि संशोधनाच्या अफाट संधी निर्माण होणार आहेत.

जागतिक स्तरावर नामांकित असणाऱ्या 'युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया'चा वीन कॅम्पस मुंबईत यशस्वीरीत्या सुरू झाला आहे. या विद्यापीठाने 'चीफ मिनिस्टर स्कॉलरशिप' जाहीर करत महाराष्ट्रातील तीन अत्यंत गुणवंत




विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्ती प्रदान केली आहे. या पुढाकारामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना परदेशात न जाता मुंबईतच आंतरराष्ट्रीय स्तराचे शिक्षण मिळणे शक्य झाले आहे. भारतीय विद्यार्थी जेव्हा परदेशात शिक्षणासाठी जातात, तेव्हा देशातील कोट्यवधी रुपयांचे परकीय चलन बाहेर जाते. मात्र, आता आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे कॅम्पस भारतातच सुरू झाल्यामुळे या परकीय चलनाची मोठी बचत होण्यास (पान २ वर)

## पालकमंत्री ना. नितेश राणे आज सिंधुदुर्ग दौऱ्यावर



**कणकवली**

महाराष्ट्र राज्याचे मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री ना. नितेश राणे हे शनिवार, १९ सप्टेंबर रोजी सिंधुदुर्ग जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ना. नितेश राणे विराजमान झालेल्या गणपती बाप्पांचे दर्शन घेणार आहेत.

# मंगेश पाडगावकरांच्या उभादांडा गावाला साहित्य पर्यटनाचे नवे रूप देणार : मंत्री उदय सामंत

## दोन महिन्यांत 'कवितांचे गाव' दिमाखदार करण्याचे निर्देश

**वेंगुर्ले (प्रतिनिधी)**

कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या साहित्यिक स्मृतींशी जोडलेल्या उभादांडा येथील 'कवितांचे गाव' उपक्रमाला नावाला साजेसे दिमाखदार स्वरूप देण्यात येणार असून, येत्या दोन महिन्यांत विकासकामांना गती देण्यात येईल. यासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही मराठी भाषा मंत्री तथा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. उभादांडा येथील 'कवितांचे गाव'ची पाहणी केल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.



'कवितांचे गाव' अधिक प्रभावी करण्यासाठी मंगेश पाडगावकर यांनी शिक्षण घेतलेल्या शाळेचे, शून्य पटसंख्या असलेल्या शाळेचे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या दालनाचे तसेच त्यांनी भेट दिलेल्या दालनाचे, अशा महत्त्वाच्या पाच दालनांना प्राधान्याने विकसित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यासंदर्भात मंत्री सामंत यांनी भाषा संचालकांना दूरध्वनीद्वारे सूचना दिल्या. भाषा संचालक उद्या उभादांडा येथे प्रत्यक्ष भेट देऊन (पान २ वर)

# ७/१२ वर नाव नसले तरी महिलांना शेतकरी प्रमाणपत्र

## राज्यभरात विशेष मोहीम राबवणार- मंत्री भरणे

**मुंबई**

शेतामध्ये कष्ट करणाऱ्या पण ७/१२ वर नाव नसल्यामुळे शासकीय लाभांपासून वंचित राहिलेल्या राज्यातील लाखो कष्टकरी महिलांना आता "अधिकृत शेतकरी" म्हणून कायदेशीर दर्जा मिळणार आहे. महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत कृषी विभागाने महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी विशेष ऑनलाइन पोर्टल सुरू केले असून, १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या महिनाभरात राज्यव्यापी सेवा संकल्प अभियान राबवले जात असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

शेतीत प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिलांचे योगदान अधोरेखित करून त्यांना सक्षम करण्याच्या दिशेने हा ऐतिहासिक टप्पा आहे. आता केवळ जमिनीची मालकी असण्याची अट संपुष्टात आली असून प्रत्यक्ष बांधावर राबणाऱ्या भूमिहीन, बटाईदार व शेतमजूर महिलांनाही कृषी कर्ज, पीक विमा आणि शासकीय योजनांचा थेट लाभ मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे," असा विश्वास मंत्री भरणे यांनी व्यक्त केला.

# हिवाळेत युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू

## यश धुरीचे देशसेवेचे स्वप्न राहिले अधुरे!

**मसुरे (प्रतिनिधी)**

मालवण तालुक्यातील हिवाळे धुरीवाडी येथील मूळ रहिवासी तथा सध्या मुंबई नालासोपारा येथे वास्तव्यास असलेल्या यश अनंत धुरी (१८ वर्ष) या महाविद्यालयीन युवकाचा हिवाळे धुरीवाडी देवकोंड पुलाच्या नजिक पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी १०.३० च्या सुमारास घडली. गुरवारी गौरी गणपती सणासाठी यश हा आपल्या वडिलांच्या समवेत मुंबई येथून गावी आला होता. गुरुवारी रात्री पासून पहाटेपर्यंत वाडीतील भजनात सहभाग घेऊन तो आपल्या घरी आला



यश धुरी

होता. शुक्रवारी सकाळी दहाच्या दरम्यान वाडीतील एका शेजारच्या मित्रासोबत गडनदीपात्रातील पुलाच्या वरच्या बाजूला (पान २ वर)

# 'कागदावर नव्हे, प्रत्यक्ष सुधारणा करा'

## एनटीएच्या कामकाजाची सर्वोच्च न्यायालय करणार पाहणी

**नवी दिल्ली**

नीट-यूजी २०२६ पेपर लीक आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीमधील सुधारणांशी संबंधित विविध याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. एनटीएच्या सुधारणा आणि सद्यस्थितीची खात्री करण्यासाठी खंडपीठ स्वतः एनटीएच्या कार्यालयाला भेट देऊ शकते, असे संकेत न्यायालयाने दिले आहेत.

न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी करताना स्पष्ट केले की, एनटीएमध्ये सुधारणा करण्यासाठी स्थापन केलेल्या उच्चाधिकार समितीच्या शिफारसी केवळ कागदावर राहता कामा नयेत, तर त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पाहिजे. एनटीएची सध्याची प्रणाली प्रत्यक्षात कशी कार्यरत आहे, तिथे मनुष्यबळ किती आहे आणि इतर व्यवस्था कशी आहे, हे वैयक्तिकरित्या तपासण्यासाठी खंडपीठ स्वतः एनटीएच्या कार्यालयाला (पान २ वर)

# रिलीजन म्हणजे धर्म नाही

## युवा धर्म परिषदेत सरसंघचालक मोहन भागवत यांचे प्रतिपादन

**अवंतिका**

मध्य प्रदेशातील अवंतिका परिसरात आयोजित तीन दिवसीय 'युवा धर्म परिषदे'चे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते पार पडले. उद्घाटनपर भाषणात त्यांनी धर्म, 'रिलीजन' या शब्दांतील फरक आणि धर्माची खरी व्याख्या स्पष्ट करत विविध मुद्द्यांवर भाष्य केले. सध्या ज्याला धर्म मानले जात आहे तो केवळ एक संप्रदाय असून, खरा धर्म त्याहूनही श्रेष्ठ आणि मानवाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत कायम अस्तित्वात असणारा आहे, असे



त्यांनी सांगितले.

आपल्या भाषणात सरसंघचालकांनी अलाहाबाद विद्यापीठातील तर्कशास्त्राचे प्रमुख गुरूदेव रानडे यांच्या विधानाचा संदर्भ दिला. "इंग्रजीत 'धर्म' या शब्दासाठी योग्य पर्याय उपलब्ध नसल्याने इंग्रजांच्या काळात 'रिलीजन' शब्द वापरला गेला. अगदी स्वामी विवेकानंदांनीही तोच शब्द वापरला, परंतु 'रिलीजन' म्हणजे धर्म नव्हे. धर्म हा 'रिलीजन'च्याही वर आहे. जेव्हा एखादा संप्रदाय धर्मानुसार चालतो, तेव्हा तो मानवाला मुक्ती देतो; मात्र धर्म सोडल्यास सांप्रदायिकता वाढून धर्माच्या नावाखाली अत्याचार सुरू होतात," असे भागवत म्हणाले. 'रिलीजन' हा शब्द 'रिलिजिओ'पासून आला असून त्याचा अर्थ बांधून ठेवणे असा होतो, तर धर्म कोणाला बांधत नाही, तो मुक्त करतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**'धृ' धातूपासून 'धर्म' शब्दाची उत्पत्ती**

'धर्म' या शब्दाच्या मुळाविषयी सांगताना त्यांनी नमूद केले की, "धर्म शब्दाची उत्पत्ती 'धृ' या धातूपासून झाली आहे, ज्याचा अर्थ 'धारण करणे' असा होतो.

(पान २ वर)

# 'गोंधळ' पोहोचला ऑस्करच्या शर्यतीत

## मराठी चित्रपटसृष्टीसाठी ऐतिहासिक क्षण!

**मुंबई**

मराठी चित्रपटसृष्टीसाठी एक अत्यंत अभिमानाची बातमी समोर आली आहे. आगामी 'ऑस्कर २०२७' पुरस्कारांसाठी भारताकडून अधिकृत प्रवेशिका म्हणून 'गोंधळ' या मराठी चित्रपटाची निवड करण्यात आली आहे. फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाने ही अधिकृत घोषणा केली असून, या निवडीमुळे मराठी चित्रपटाला जागतिक व्यासपीठावर आपली मान उंचावण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे.

संतोष डावखर यांच्या दिग्दर्शनाखाली आणि 'डावखर फिल्म्स'च्या बॅनरखाली निर्मित झालेला 'गोंधळ' हा चित्रपट महाराष्ट्राच्या ग्रामीण लोकजीवनावर आधारित आहे. महाराष्ट्राची पारंपरिक



धार्मिक-सांस्कृतिक लोककला 'गोंधळ' या विधीला केंद्रस्थानी ठेवून ही कथा आकाराला येते. लोकपरंपरा, अंधश्रद्धा, कौटुंबिक नाती आणि मानवी संघर्षांचे वास्तववादी चित्रण या चित्रपटात करण्यात आले आहे. चित्रपटात किशोर कदम, इशिता देशमुख, योगेश सोहोनी, निषाद भोईर, अनुज प्रभू आणि सुरेश विश्वकर्मा यांच्या प्रमुख आणि सशक्त भूमिका आहेत.

**ऐतिहासिक यश**

ऑस्करच्या शर्यतीत स्थान मिळवण्यापूर्वी 'गोंधळ'ने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये अनेक पुरस्कार पटकवले आहेत. 'इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडिया' मध्ये तब्बल ५६ वर्षांनंतर 'इंडियन पॅनोरमा' विभागात सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा 'सिल्व्हर पीकॉक' पुरस्कार पटकावणारा हा मराठी चित्रपट ठरला. पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट छायाचित्रण असे दोन महत्त्वाचे पुरस्कार मिळाले. थर्ड आय एशियन फिल्म फेस्टिव्हल २०२६ च्या २२ व्या महोत्सवात संतोष डावखर यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला. झी चित्र गौरव २०२६ मध्ये सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (पदार्पण),

(पान २ वर)

# बायोमेट्रिक जुळत नसल्यास आधार ओटीपीचा पर्याय

## एसटीच्या सवलतीप्राप्त प्रवाशांसाठी एनसीएमसी कार्ड नोंदणी प्रक्रियेत बदल

**मुंबई (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) एनसीएमसी कार्ड प्रकल्पांतर्गत अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला सवलतधारक प्रवाशांसाठी कार्ड नोंदणी व वितरणाची प्रक्रिया सुरू आहे. प्रवाशांना सवलतीचा लाभ अधिक सुलभपणे मिळावा यासाठी महामंडळाने काही महत्त्वाचे बदल केले असून, संबंधित लाभार्थ्यांनी त्याची नोंद घ्यावी, (पान २ वर)

### हरवलेले किंवा चोरीला गेलेले कार्ड पुन्हा मिळणार

२१ सप्टेंबरपासून हरवलेले अथवा चोरीला गेलेले एनसीएमसी कार्ड ब्लॉक करून रु. १९९ शुल्क भरून नव्याने नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

### नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना २५ सप्टेंबरपासून कार्ड वितरण

१९ सप्टेंबरपर्यंत एनसीएमसी कार्डसाठी नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना २५ सप्टेंबर २०२६ पासून कार्ड वितरणासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.